पुणे वन विभागातील मौजे बावधान येथील वन्यप्राण्यांचे उपचार केंद्रा अंतर्गत रस्ते व क्रॉस ड्रेनेज कामे करण्याच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग,

शासन निर्णय क्र.डब्ल्यूएलपी ०६.१९/प्र.क्र.१७०/फ-१

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक :- २० ऑगस्ट, २०१९.

वाचा :- प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांक :- कक्ष-२४/लेखा/प्र.क्र. ०६(H)/१९८/२०१९-२० नागपूर, दिनांक ०४.०६.२०१९.

प्रस्तावना-:

संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रसाठी पुणे हे मध्यवर्ती ठिकाण असल्याची बाब लक्षात घेता येथे वन्यप्राणी उपचार केंद्र (ट्रांझिट ट्रिटमेंट सेंटर) स्थापन करण्यासाठी सुयोग्य असलेल्या क्षेत्राची उपलब्धता, पाण्याची मुबलकता, सदर क्षेत्रामध्ये येण्या-जाण्यासाठी असणारी सुलभता, मार्गदर्शनासाठी या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींची उपलब्धता, दळणवळणाच्या सुविधा, पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीप अंतर्गत कामे करण्यासाठी तयार असलेले बहुविध पर्याय या सर्वांचा सर्वकष विचार करून पश्चिम महाराष्ट्रामध्ये आढळणा-या जखमी व अपंग वन्यप्राण्यांसाठी पुणे येथे वन्यप्राणी उपचार केंद्र (ट्रांझिट ट्रिटमेंट सेंटर) विकसित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सदर वन्यप्राण्यांचे उपचार उपचार केंद्रा अंतर्गत रस्ते व क्रॉस ड्रेनेज कामे करण्याच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -:

पुणे वन विभागातील मौजे बावधान येथील वन्यप्राण्यांचे उपचार उपचार केंद्रा अंतर्गत रस्ते व क्रॉस ड्रेनेज कामे करण्याच्या रुपये रु. ६६३.८१ /- लक्षच्या अंदाजपत्रकास सोबत जोडलेल्या विवरणपत्रानुसार खालील अटीस अधीन राहून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सहमतीने प्रशासकीय मान्यता (वित्तीय मान्यता वगळून) देण्यात येत आहे.

अ) ढोबळ स्वरूपात धरण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक करुनच काम हाती घ्यावे.

आ) सदर कामे सुरू करण्यापूर्वी जागेच्या मालकी हक्काबाबतची खातरजमा करण्यात यावी.

इ) प्रस्तुत काम पुरातत्व विभागाच्या अखत्यारित येत असल्यास संबंधीत विभागाची तसेच महानगरपालिका व तत्सम प्राधिकरणे यांची पूर्व परवानगी घ्यावी.

ई) प्रस्तावातील खरेदीशी संबंधीत बाबीकरिता ई-निविदा प्रणालीचा वापर करावा अथवा उद्योग, उर्जा व कामगार विभागाकडील दि.२४.०८.२०१७ च्या शासन निर्णयान्वये वस्तू व सेवा खरेदीकरीता केंद्र शासनाने विकसित केलेल्या GeM पोर्टल कार्यपध्द्तीचा अवलंब करणे शक्य आहे किंवा कसे, या बाबीचा उपभोक्ता विभागाने त्यांच्या स्तरावर स्वतंत्ररित्या विचार करावा.

उ) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/प्र.क्र.१७७/तां.क.१, दि.१० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करण्यात यावी.

ऊ) स्थापत्य कामाच्या कालावधीतच विद्युतीकरणाबाबत तसेच इतर अनुषंगिक कामांचे योग्य नियोजन करून सदर कामे पुर्ण करावती.

ऋ) विषयांकित कामाकरिता सुधारित प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता लागणार नाही. यादृष्टीने विशेष दक्षता घेऊन काम करण्यात यावे.

ऌ) वन(संवर्धन) अधिनियम, १९८० कायद्याचा व केंद्रीय चिडीयाघर प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी ठरवून दिलेल्या नियमांचा भंग होणार नाही याची खातरजमा करूनच कामे सुरू करण्यात यावी.

२. सदरचा आदेश वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, मुंबई. दिनांक १७ एप्रिल, २०१५ मधील उपविभाग-५, महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीकेतील बाब क्रमांक १३४ नुसार विभागास असलेल्या वित्तीय अधिकारानुसार व सार्वजनिक बांधकाम विभाग यांचा अनौपचारीक संदर्भ क्रमांक :- १६७/इमा-३, दिनांक १९.०७.२०१९ ला अनुलक्षून ,निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८२०१६३७०९१८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL DESHBHRATAR

Digitally signed by SWAPNIL DESHBHRATAR
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=9add558653210cf44615291102f1bf143783e8403be64c06c7928e692d77c386, postalCode=400037,
street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=ce420aedd83773a67f861ab4c751835b3c5119f8fc41f2f3aa39bd7749dc02e0, ou=FOREST DEPARTMENT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SWAPNIL DESHBHRATAR
Date: 2019.08.20 16:42:21 +05'30'

(स्वप्निल देशभ्रतार)
विशेष कार्य अधिकारी
महसूल व वन विभाग.

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर,
३. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे.
४. उपवनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे वन विभाग, पुणे.
५. महालोखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर
६. कक्ष अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग(इमारत-३), मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
७. वित्त विभाग, व्यय-१० कार्यासन, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
८. नियोजन विभाग (का-१४७५), मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
९. फ-२/ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
१०. कार्यासन फ-१ महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२ (निवडनस्ती).

शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.डब्ल्युएलपी ०६.१९/प्र.क्र.१७०/फ-१ दिनांक:- २०.०८.२०१९ सोबतचे विवरणपत्र

अ.क्र.	कामे	रुपये
१	रस्ते	५,१२,७९,८५२.००
२	क्रॉस ड्रेनेज कामे	४८,७०,३७६.००
	एकूण (अ)	५,६१,५०,२२८.००
३	स्वामित्व शुल्क	२,७९९.००
४	गुणवत्ता चाचणी शुल्क	६,०६,२५०.००
५	अकस्मिक शुल्क (अ)चे ४ टक्के	२२,४६,००९.१२
	एकूण (ब)	५,९०,०५,२८६.१२
६	मजूर विमा (ब) चे ०.५ टक्के	२,९५,०२६.४३
७	जी.एस.टी. (ब) चे १२ टक्के	७०,८०,६३४.३३
		६,६३,८०,९४६.८९
	एकूण	६६३.८१ **लक्ष**